# आम्ही उपक्रमशील शिक्षिका

## तालुका - जामनेर जिल्हा - जळगाव



## जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जळगाव

सन. 2020-21

# आम्ही उपक्रमशील शिक्षिका

## ता. जामनेर जि. जळगांव


**प्रकाशक**

प्राचार्य,

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था , जळगांव

**प्रेरणा**

श्री. दिनकर पाटील

संचालक , महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद, पुणे



**संकल्पना निर्मिती व संकलन**

प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था , जळगांव

**संपादन**

डॉ.मंजुषा क्षीरसागर

प्राचार्य, डायट, जळगांव तथा

संपर्क अधिकारी , जामनेर

श्रीमती मंगल म्हेत्रे

प्रा.शिक्षिका जि.प.प्रा.शा.पहूरपेठ ( मराठी मुलींची ) ता.जामनेर

**संपादन सहकार्य**

१.डॉ. मंगेश घोगरे

वरिष्ठ अधिव्याख्याता, डायट, जळगांव

२. अरुण भांगरे

वरिष्ठ अधिव्याख्याता, डायट, जळगांव

३.सुचेता पाटील

अधिव्याख्याता, डायट, जळगांव

**४.डॉ. राजेंद्र महाजन**

अधिव्याख्याता, डायट, जळगांव

**५. विद्या बोरसे**

अधिव्याख्याता, डायट, जळगांव

**६. शैलेश पाटील**

अधिव्याख्याता, डायट, जळगांव

**७. प्रदीप पाटील**

अधिव्याख्याता, डायट, जळगांव

## सहकार्य

**१. श्री महेंद्र नाईक**
विषय तज्ञ, जामनेर

**२. श्री दिपक पालवे**

प्रा.शिक्षक , जामनेर

**३.श्री अनिल माळी**

प्रा.शिक्षक , जामनेर

**४. श्रीमती माया शेळके**

प्रा.शिक्षक , जामनेर

**५. श्रीमती सविता वाघुळदे**

प्रा.शिक्षक , जामनेर

**६. श्रीमती मंगला जवळेकर**

विषय तज्ञ, जामनेर

## मुखपुष्ठ व अंतर्गत सजावट

**श्री दिपक पालवे**

जि.प.मराठी शाळा खडकी ता.जामनेर

**श्री संदिप सोनार**

जि.प.मराठी शाळा टाकळी बु.ता.जामनेर

# अनुक्रमणिका


१."चला शिक्षणाची गुढी उभारूया, राष्ट्र प्रगत करूया करूया'......... ज्योती उंबरकर

२.तयारी स्पर्धा परीक्षेची............. मंगल म्हेत्रे

३."खडयांच्या संगतीने खेळू या,शिकू या.'........... सुवर्णा आव्हाड

४.अकॅडेमिक मेडीटेशन........ मनीषा भामेरे

५.आनंदाने वाचू इंग्रजी........... दीपाली बुडूखले

६.विद्यार्थी उपस्थिती वाढविणे व शाळेची गोडी निर्माण करणे..... दीपाली पंडित

७.अंकातून चित्रनिर्मिती.............. सविता धुरडे

८.मानवी तसेच विविध वस्तुंच्या मदतीने मनोरे तयार करणे........ माया शेळके

९.विज्ञानाची परसबाग................ वर्षा सुरवाडे

१०.संगणक भागांची ओळख............ कविता चौधरी

११. हसत खेळत इंग्रजी वाचन करूया............. भारती पाटील

# मनोगत. . .

नमस्कार !

जामनेर माझा संपर्क तालुका! प्रशासन आणि प्रशिक्षण विभागाचे टीम वर्क हे तालुक्याचे वैशिष्ट्य . गेल्या चार वर्षात तालुक्यातील अनेक शाळांना भेटी दिल्या. त्या निमित्ताने खूप शिक्षकवर्गांच्या वर्गांतरक्रिया पाहण्याचा योग आला. यात आणखी भर निष्ठा प्रशिक्षणाने घातली. निष्ठा प्रशिक्षणात SRP म्हणून काम करतांना शिक्षकवर्गाशी उत्तम संवाद झाला. यावेळी सर्व शिक्षकांशी गट्टी झाली. कोरोना पार्श्वभूमीवर लॉकडाऊन काळात शिक्षकांशी संवाद होऊ लागले . त्यांना वर्गात घेतलेल्या उपक्रमांना लिहून काढण्यास सांगितले . त्याला अध्ययन निष्पत्ती, अध्ययन अनुभव , फलनिष्पत्तीची जोड दिली . सगळ्यांच्या प्रयत्नाने त्याला पुस्तकाचे रूप प्राप्त झाले. प्रस्तुत पुस्तक सृजन उपक्रमशिल शिक्षक वर्गाचे नेतृत्व आणि इतरांना प्रेरणा , मार्गदर्शन देणारे ठरेल असा विश्वास वाटतो.

डॉ. मंजुषा क्षीरसागर
प्राचार्य तथा संपर्क अधिकारी ( जामनेर) ,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था , जळगाव

# उपक्रमाचे नाव :- चला शिक्षणाची गुढी उभारूया राष्ट्र प्रगत करूया

विषय:- भाषा, गणित (याबरोबरच इतर विषयांसाठीही उपयोग करता येतो.)

उपक्रमाचे नाव:- " चला शिक्षणाची गुढी उभारूया, राष्ट्र प्रगत करूया करूया"

●उपक्रमाचा कालावधी-

विषयानुरूप आठवड्यातील दोन तासिका.

● उपक्रमाचा हेतू / अध्ययन निष्पत्ती:- ( उपक्रमाशी संबंधित )

●भाषा :- ●०३/०१/०५:- गोष्टी ,कविता किंवा इतर साहित्यप्रकार समजून घेऊन त्यात स्वत: च्या माहितीची भर घालतात.

●०३/०१/०८:- विविध साहित्यप्रकारात आलेल्या नवीन शब्दांचा अर्थ समजून घेऊन त्याचा अर्थ सुनिश्चित करतात.

●गणित:- ●०३/७१/०१:- कमी रकमेची बेरीज,वजाबाकी हातचा न घेता करतात.

●प.अ. :- ●०३/९५/०१ :- आसपासच्या परिसरातील वनस्पतींची पाने,खोड,साल इ.ची सर्वसाधारण निरीक्षणक्षम वैशिष्ट्ये ओळखतात.

●इंग्रजी:- ●०३/१७/१२ :- Identifies opposites like {day × night,close × open} and such other s.

●०३/१७/१८ :- Write all letters correctly and proportionality.

## उपक्रमाची कार्यवाही

लहान मुलांना नेहमीच खूप प्रश्न पडतात.अनेक गोष्टींविषयी त्यांना कुतूहल वाटत असते. त्यांची जिज्ञासा जाणून शिक्षकांनी योग्य उत्तरे दिली,तर मुलांना मिळालेल्या ज्ञानाने मुले आनंदी तर होतातच.पण शिक्षकांनाही त्यातून समाधान मिळते.

अशाच एका अनुभवविषयी....

हिरव्या निसर्गाच्या सान्निध्यात वसलेली माझी शाळा , जि.प.मराठी शाळा जळांद्री बु. चहूबाजूंनी हिरवळ समोर खळखळ वाहणारी नदी अशा आल्हाददायक वातावरणात उभी असलेली आमची मराठी शाळा रोजच्या प्रमाणे आज पण मी वर्गात आले. मुलांनी छान स्वागत केले. हजेरी झाली. आज माझा पण मूड छान होता. मस्त कृतीयुक्त कविता शिकवावी अशी मनात जुळवाजुळव करीत असताना वर्गातला रितेश म्हणाला मॅडम, गुढी म्हणजे काय? इतर मुले-मुली त्याच्या प्रश्नावर खदखद हसू हसली. मी अवाक झाले.भावेश म्हणाला अरे, ते वर काडीला तांब्या,साडी लावतात ते त्याला गुडी म्हणतात.कोपऱ्यातील ममता म्हणते कशी," मॅडम, गुढी का उभारतात?"

तेवढ्यात वर्गातील सर्वात चुणचुणीत आमचा रविंद्र उठला आणि तावातावाने सांगू लागला."अरे, गुढी ही गुढीपाडव्याला उभारतात एवढे पण समजत नाही. हो की नाही मॅडम." आता गप्प राहून चालणार नव्हतं; कारण मुलांचं पूर्ण समाधान होईपर्यंत समजावून सांगणं हा माझा शिरस्ता होता.मी म्हणाले, अगदी बरोबर रविंद्र ,गुढी गुढीपाडव्यालाच उभारतात. पण ममता चा प्रश्न आहे का उभारतात? सांगशील!त्यावर रविंद्र हिरमुसला व म्हणाला नाही माहिती मॅडम.

मी म्हणाले , गुढीपाडवा या दिवसापासून नवीन वर्षाची सुरुवात होते हा दिवस वर्षातील चार मुख्य मुहुर्तांपैकी एक असल्याने व याच दिवशी श्रीराम १४ वर्षांच्या वनवासानंतर रावणाचा वध करून अयोध्येत आले म्हणून आपण गुढी उभारून आनंद उत्सव साजरा करतो.

या दिवशी काठी घेऊन, काठीच्या वरच्या निमुळत्या टोकावर कडुलिंबाचा पाला,फुल,साखरेचे कंगणे,गाठीची माळ, केशरी रंगाचे वस्त्र गडी करून ठेवून त्याच्या समवेत वरील सर्व गोष्टी एका सूत्राने पक्क्या बांधून त्यावर कलश सदृश्य एखादे पात्र कपडे झाकावे.ही गुढी आपल्या गृहप्रवेशा समोर उभी करावी.हे एकूण मुले म्हणाली,हो मॅडम माझी आई पण असेच करते.एवढ्यात मधली सुट्टी झाली. मुले जेवायला बाहेर गेली. विचार करीत असताना गुढी- गुढी चांगल्या विचारांची, आरोग्याची असते. याच गुढीचा वापर ज्ञानात करायचा का? होय बरोबर.

एवढ्यात सुट्टी संपली ,मुले वर्गात आली. मुलांनो,आज आपण गुढी विषयी माहिती घेतली.हीच गुढी आपण तयार करायची का? मुले आनंदाने ओरडली , हो मॅडम. ठीक आहे पण एक आहे आपण उभारायची पण तुम्ही घरी उभारतात तशी नव्हे. मुले थोडी गोंधळात पडली. कीर्ती म्हणाली, मॅडम मग कशी उभारायची गुढी? मी म्हणाले आपण उभारायची "ज्ञान गुढी". मुले म्हणाली, ती कशी मॅडम? मी म्हणाले ही गुढी असेल ज्ञानाची, इंग्रजी शब्दांची, गणिती सूत्रांची, उदाहरणांची, विज्ञानातील गंमतीची, सर्व प्रकारच्या ज्ञानावर आधारित ज्ञानावर आधारित गुढी उभारूया आणि आपण सर्व ज्ञानाच्या अथांग सागरात पोहूया. मग मी फळयावर एक लहानशी ज्ञान गुढी साकारली.ही फळयावरील ज्ञान गुढी पाहताच मुलांना त्यांच्या प्रश्नांची उत्तरे उमजली. शेवटच्या बाकावरील स्वप्निल म्हणाला, मॅडम मी समानार्थी शब्दांची ज्ञानगुढी तयार करतो. प्रांजल म्हणाली मी पाढ्यांची गुढी तयार करते. अशाच प्रकारे वर्गातील सर्व विद्यार्थी नाविन्यपूर्ण ज्ञान गुडी तयार करण्याबाबत चर्चा करू लागली. कुणी म्हणे विरुद्धार्थी शब्द, इंग्रजी महिने, थोर नेते-क्रांतिकारक, रोमन संख्या चिन्ह, बेरीजची उदाहरणे, पाठ्यपुस्तकातील

कविताची गुढी, अशी विविध उत्तरे विद्यार्थी देऊ लागले.

बस्स....

दुसऱ्या दिवसापासून माझी विद्यार्थी सेना कामाला लागली. थोड्याच दिवसात वर्गही अनेक प्रकारच्या रंजक, रेखीव, सुंदर अशा ज्ञानरुपी गुढयांनी सजला. काही मुलांच्या गुढीत उणिवा होत्या,त्या योग्य मार्गदर्शनाने दुरुस्त केल्या.



हा उपक्रम मराठी, इंग्रजी, गणित, अशा सर्वच विषयांसाठी उपयोगात आणता येईल.

● **उपक्रमाची वैशिष्ट्ये :-**

१)ही ज्ञानगुढी तयार करायला कमी वेळ लागतो.

२)कमी खर्चात तयार करता येते.

३)ह्या उपक्रमातुन विविध विषयांच्या मूलभूत संकल्पना दृढ होतात.

◆ **उपक्रमाची फलनिष्पत्ती:-**

१.) विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्य सुधारले.

२.)विद्यार्थी शब्दांचा अर्थ समजून घेऊन माहिती माहिती सांगू लागले.

३.)वर्गासमोर धीटपणे आत्मविश्वासपुर्वक बोलू लागले.

४.)ज्ञान गुढी बनविण्यासाठी अवांतर वाचन करू लागले.

५.)मुद्देसूद लेखन करू लागले.

६.)अवघड वाटणारा विषय सोपा वाटू लागला.

७.)विविध विषयांचा ज्ञानगुढयांमुळे उत्साह वाढला.





**ज्योती अमितकुमार उंबरकर**

**शाळा:- जि.प.मराठी शाळा, जळांद्री बु.**

**केंद्र - शहापूर.**

**ता. जामनेर. जि. जळगाव**

## उपक्रमाचे नाव-तयारी स्पर्धा परीक्षेची.....

विषय:--सामान्य ज्ञान

**अध्ययन निष्पत्ती / उपक्रमाचा हेतू --**

०४.९५B.०५ --छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध स्फूर्तिदायी घटना सांगतात

०४.९५A.१७.--आपला जिल्हा व राज्य यांची प्राकृतिक व मानवनिर्मित घटक या अनुसंधाने तुलना करतात.

**उपक्रमाची कार्यवाही :-**

आमची शाळा बाजारपेठेत असल्यामुळे दुपारी मुलींनी पोषण आहार घेतला की त्या बाजारात फेरफटका मारून येतात आणि पूर्ण शाळा शांत होऊन जाते. रोज दुपारी शांत वातावरणात बसले असताना माझ्या मनात सतत एक विचार घोळत होता. नेहमी वाटायचं की 'आपण ,x xcvमुलींना फक्त अभ्यासक्रम शिकवून त्यांच्यावर अन्याय तर करत नाही? कारण पाठ्यक्रम हे शेवटी एक माध्यम आहे .या स्पर्धेच्या युगात आपण त्यांना मागे तर टाकत नाही?'अस द्वंद्व मनात सुरू असताना एका शिक्षिकेच मन जिंकलं आणि ठरवलं की माझ्या मुलींना स्पर्धेत टिकविण्यासाठी पुढे येणाऱ्या आव्हानाना सामोरे जाण्यासाठी त्यांना आजपासूनच तयार करायचे असा निर्धार केला.

सुट्टी संपली मुली वर्गात आल्या. आज पण नेहमी प्रमाणे मधल्या सुट्टीनंतर मुलींचं वर्गात अजिबात लक्ष लागत नव्हते म्हणून त्यांना म्हणाले, "आज आपण आपल्या तालुक्याची चर्चा करू या ."आम्ही जामनेरची माहिती चर्चा करून घेतली. आणि दुसऱ्या दिवशी ह्याच वेळेत कालच्या भागावर त्यांना प्रश्न विचारले .तीन ते चार मुलींनी अचूक उत्तरे दिली.

अशा प्रकारे मी २:३० ते ३:०० या वेळेत रोज त्यांना तालुका, जिल्हा, राज्य ,राज्याची नावे त्यांची राजधानी, देश, महापुरुषाच्या जयंत्या, पुण्यतिथी, चालू राजकीय घडामोडी ,भौगोलिक माहिती, शिवाजी महाराजांच्या विषयी, राजकीय महिला, देशाच्या पदावरील पहिल्या व्यक्ती, निसर्गाची माहिती, ऋतुचक्र ,गावाची माहिती,राष्ट्रीय प्रतीके इत्यादी माहिती त्यांना सांगायची आणि दुसऱ्या दिवशी त्यावर प्रश्न विचारायची. मुली लक्षपूर्वक ऐकू लागल्या आणि प्रश्नांची उत्तरे देऊ लागल्या.

त्यानंतर मी मुलींना रोज एक प्रश्न देऊ लागले आणि त्या प्रश्नाचे उत्तर आजूबाजूला शोधून आणा अस सांगु लागले. मग माझ्या मुली त्या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी आजूबाजूला जाऊन चर्चा करू लागल्या अनेक मार्गाने आपल्या प्रश्नांची उत्तरे शोधू लागल्या . त्यामुळे एका प्रश्नाचे उत्तर शोधताना त्यांना नवीन माहिती मिळू लागली.

जसे :-सावित्रीबाई फुलेंचा जन्म कधी झाला हे शोधायला लावल्यानंतर ते शोधताना त्यांना त्यांच्याविषयी अधिक माहिती मिळू लागली नाही त्यांना त्यात गोडी निर्माण झाली. त्यांनी स्वत: शोधल्यामुळे मुलींच्या स्मरणात राहू लागले . आज कोणता प्रश्न असेल ही उत्सुकता वाढू लागली. खूप सरावाअंती दोन्ही वर्गाच्या मिळून २० ते २२ मुली जवळपास १२० ते १५० प्रश्नांची उत्तरे अचूकपणे सांगू लागल्या. उलट त्या मला वेगवेगळी माहिती शोधून सांगू लागल्या. आम्ही आमचा उत्साह कधीच कमी होऊ दिला नाही.

वर्षभर राबविलेला उपक्रम एका शनिवारी परिपाठ ऐवजी हे मुलींचे दोन गट केले. दोन्ही गटाला सामान्य ज्ञान चे प्रश्न विचारले. मुलीनी न घाबरता आत्मविश्वासाने खूप छान उत्तरे दिली सगळ्या स्टाफनी मुलींचं कौतुक केले . त्यामुळे त्यांना अधिकच स्फुरण आले .



जिल्हा परिषद मराठी मुलींची शाळा पहुरपेठ

एका दिवशी तिसरीच्या वर्गातील जानवी च्या पप्पाचा मला फोन आला. ते म्हणाले, "hello, मॅडम जानवी चे पप्पा बोलतोय ,आमची जान्हवी आम्हाला खूप त्रास देते रोज मला नवीन चार पाच प्रश्न विचारत असते, मॅडम आम्ही कमी शिकलोय मग आम्हाला कुठे काय येते ? तेच पण म्हणाले . मी शिकलो नाही पण ती खूप शिकतेय एवढेच मला कळतंय. तुमच्याबद्दल खूप सांगते. या एकदा आमच्याकडे चहा घ्यायला."एवढं बोलून त्यांनी फोन ठेवला. तो कॉल माझ्यासाठी एका मोठ्या पुरस्कारापेक्षाही खुप मोठा आनंद देणारा होता.

त्यावेळी वाटले की ,माझ्या या गुणी मुलींना उचलुन घ्यावे आणि उंच हवेत अलगद झेलावे. त्यांची तक्रारीतही समाधान आणि मुलीबद्दल अभिमान आणि माझ्या बद्दल आदर असा त्रिवेणी संगम होता जणू!

मी रोज त्याच वेळेत मुलीना नवीन  माहिती सांगू लागले आणि मागील भागावर प्रश्न विचारल्याने त्यात एक सातत्य आले आणि मुलींचा खूप सराव झाला.




मंगल विश्वनाथ म्हेत्रे

जिल्हा परिषद मराठी मुलींची शाळा पहुरपेठ


ता. जामनेर जि. जळगांव

## उपक्रमाची फलनिष्पत्ती / :

1. मुलींचे सामान्य ज्ञान वाढले.
2. मुली विचार करू लागल्या .
3. नवीन माहिती विषयी उत्सुकता वाढली.
4. महापुरुषांची ओळख आणि त्यांच्या विषयी आदर निर्माण झाला.
5. देशप्रेम निर्माण झाले.











## उपक्रमाचे नांव – 'खडयांच्या संगतीने खेळू या,शिकू या.

**विषय -** भाषा ,गणित (याबरोबरच कला,कार्यानुभव,शा.शिक्षण या विषयांसाठीही उपयोग करता येतो.)

**उपक्रमाचा हेतू / अध्ययननिष्पत्ती :-**

**भाषा :**

अ.नि.क्रमांक १० : वर्णमालेतील अक्षरे व ध्वनी ओळखतात.

अ.नि.क्रमांक १२: लेखन शिकवतांना विकासस्तरानुसार चित्रे,आडव्या,तिरप्या रेषा आकृत्या स्वयं पद्धतीने लेखन आणि स्व-नियंत्रित लेखनाच्या माध्यमातून ऐकलेले आणि आपल्या मनातील विचारांना आपल्या पद्धतीने लिहिण्याचा प्रयत्न करतात.

**गणित:**

अ.नि.क्रमांक ३ :वस्तूंच्या,चित्रांच्या/चिन्हांच्या साहाय्याने २० पर्यंतच्या संख्यांची नावे म्हणतो व मोजतो.

अ.नि.क्रमांक ८: वस्तू वापरून ९ पर्यंतच्या संख्यांची बेरजांची रचना करतो.उदा.३+३हे उदाहरण मांडून,मोजून ३+३=६असा निष्कर्ष काढतो.

अ.नि.क्रमांक ९:वस्तू वापरून १ ते ९ अंकाच्या मदतीने वजाबाकी करतो.

उदा.९ वस्तूच्या समूहातून ३ वस्तू बाजूला काढल्या आणि उरलेल्या वस्तू मोजून ९ - ३ =६ असा निष्कर्ष काढतो.

**उपक्रमाची कार्यवाही :-**

भूमीपुत्रांच्या कष्टाने बहरलेल्या निसर्गाच्या सान्निध्यात वसलेली आमची मादणी गावची छोटीशी टुमदार व्दिशिक्षकी शाळा..."असावा सुंदर चॉकलेटचा बंगला ...." याउक्ती नुसार स्वप्नवत वाटणारी आमची शाळा गावाच्या चारही बाजूंनी ऊसाचे मळे,केळीच्या बागा,लागूनच धरणाचा अथांग म्हणायला हरकत नाही असा निळाशार जलाशय...सर्वच कसं सुपीक नि समृद्ध...!

दिवसरात्र शेतात राबणा-या ,हातावर पोट असणा-या कष्टक-यांचीच बाळे आमच्या शाळेत. सर्वच काटक नि हुन्नरी.पण म्हणतात ना, हाताची पाचही बोटं सारखी नसतात,तशीच माझी इ १ली व २रीची मुले.काही सांगता बरोबर शिकायला तयार,तर काही कंटाळा करणारी तर काही शिकण्याचे-अभ्यासाचे भय वाटणारी...प्रश्न होता तो कंटाळा आणि भय वाटणा-यांच्या ...काहीही सांगितले तर ह्यांचे उत्तर ठरलेले...पाटी नाही,खडू नाही,वही नाही, पेन पण नाही, पेन्सिलही नाही.भय अन् कंटाळा यावर बोलून ते अधिक गडद करण्यापेक्षा वेगळा पर्याय शोधला तर बिन पाटी, खडू, पेन, पेन्सिलीचा...

मुलांना मुक्त खेळायला खूप आवडते,मग सोडले त्यांना मोकळे

मैदानावर , सांगितले,"तुम्हाला आवडेल ते खेळा."मुलेही सुसाट सुटली.

अन् मनात एक कल्पना आली फुकटची




दररोज संध्याकाळी शाळा सुटण्याअगोदर पाढे,कविता, गाणी,सामान्य ज्ञान घेतले जाते ,त्यावेळी नजर चुकवून बाजूला पडलेले छोटे छोटे खडे मुले एकमेकांना फेकून मारायचे त्याच खड्यांचा उपयोग केला ...

मुलांना सर्वप्रथम पटांगणातले खडे वेचायला सांगितले. कोण सर्वाधिक वेचतं बरं! अशी चढाओढ लागली.मुले उत्साहाने खडे वेचण्यात दंग झाली.आणि आश्चर्य जी मुले अभ्यासाला कंटाळा करणारी , ती सर्वात पुढे !

मुले ओंजळी भरभरून खडे घेऊन आले."आत्ता मॅडम लवकर सांगा,कोणाचे जास्त आहेत ते?" " अरे हो..हो जरा दम घ्या की,आपल्याला याचे पुढे काय करायचे आहे ते तर ऐका. बघा या खड्यांचे मी काय करते !"मुले कुतूहलाने बघू लागली.मी लगेच भरभर मांडून अक्षर तयार केले. मुलांना गंमत वाटली.म्हणाले, "आम्ही पण करू का मॅडम असेच" "हो तर." पाहता पाहता मुलांनी संपूर्ण चौदाखडीच तयार करून टाकली...आणि हो... कंटाळा करणारी ,शिकण्याची-अभ्यासाची भिती वाटते अशा मुलांचा उत्साह तर ऊतू जात होता.

त्यानंतर रोजच नवे शब्द,गावांची नांवे,मुला मुलींची नांवे,छोटी वाक्य , शब्दडोंगर तयार करू लागले.वहीत नोंदवू लागले.

आत्ता कोणाला कंटाळा करणारी म्हणावे,कोणाला अभ्यासाचे भय वाटते म्हणावे?हे बारकाईने लक्ष ठेवले तरी अशी मुले मला दिसेनाशी नाही.

भाषेचा हा उपक्रम गणितासाठीही चपखल लागू झाला.खडे मोजणे,अंक -

संख्या सांगणे ,दशक ,बेरीज,वजाबाकी मुले भरभर खडे मांडून करू लागली. खड्यांचा सेफरेट बॉक्सच प्रत्येकाने केला होता. तो ते सदैव सोबत ठेवत.रिकामा वेळ मिळाला की,कधी एकटे,कधी दोघं-दोघं तर कधी गटात त्यांचे खड्यांचा सहाय्याने शिकणे शिकवणे चाललेले असायचे .

एक खडा वर फेकून एक मग दोन,तीन,चार असे गट करून खडे उचलणे, झेलणे या खेळाने अंकांचे दृढीकरण झाले आणि बैठा मनोरंजनात्मक खेळही शा.शिक्षणाच्या तासिकेत घेता आला.

कला या विषयातही हा उपक्रम कामी आला .संगित शिकताना एक टाळी एक चुटकी, दोन टाळया दोन चुटक्या याबरोबरच दोन खड्यांचा आवाज,

एकापेक्षा जास्त खडे ओंजळ बंद करून निर्माण होणारा नाद वेगळाच आनंद देणारा होता.याच खड्यांचा सहाय्याने विद्यार्थ्यांनी नक्षी तयार केली ,पाना फुलांनी सजवली आणि कार्यानुभव सहसंबंध जुळला.

यानंतर कधीही पाटी खडू पेन पेन्सिल आणायला तसेच काढायला सांगावे लागले नाही.नाही आणले तर पाटीवर आणि खड्यांचे पाहिल्यावर बरोबर म्हणण्याचा नियम तयार झाला होता.

## उपक्रमाची फलनिष्पत्ती :-

1. विद्यार्थ्यांच्या मनातील कंटाळा ,भय दूर झाले.
2. शिकणे /अभ्यास ही फार अवघड गोष्ट नसते.आपण खेळतो तसे शिकणे/अभ्यास असतो,अशी आल्हाददायक भावना मुलांच्यामनात निर्माण झाली.
3. मुळाक्षरे,शब्द,अंक,बेरीज,वजाबाकी सहज जमू लागले.
4. TV ,मोबाईल या सारख्या गॅझेटपासून मुले आपोआप दूर गेली.
5. जे साहित्य (खडे) या उपक्रमाला लागते,ते सहज कुठेही उपलब्ध होत असल्याने, संपल्यावर कोठून आणायचे असा प्रश्न विद्यार्थ्यांना पालकांना पडणारा नव्हता, तासनतास मुले त्यात रमत होती.



श्रीमती सुवर्णा सुभाष आव्हाड
जि.प.शाळा मादणी
ता.जामनेर,जि.जळगांव.

## उपक्रमाचे नाव--अकॅडेमिक मेडीटेशन

विषय-- आरोग्य शिक्षण(शा.शि.)

**उपक्रमाचा हेतू / अध्ययननिष्पत्ती :-**
मुलं मानसिक दृष्ट्या सुदृढ होणे, एकाग्रता वाढणे, लक्षपूर्वक ऐकण्याची सवय लागणे, स्मरणशक्ती वाढणे इ.

**उपक्रमाची कार्यवाही :-**

जामनेर पासून अवघ्या १७ किमी अंतरावरील वाघूर नदी परिसरातील माझी उपक्रशील शाळा. माझ्या गावाचे नाव सांगीत ल्यावर प्रत्येकाचा पहिला प्रश्न असतो कोणते पळासखेडे? कविवर्य ना .धो. महानोरांचे,काकर,जामनेरजवळचे..की मिराचे?? )कारण इतके पळासखेडे आहे जामनेर तालुक्यात...

आमची शाळा गावाच्या अगदी मधोमध, मुख्य चौकात,ग्रामपंचायतीला लागूनच. आमची शाळा दोन इमारतीत भरते.दोन म्हणजे गावातील इमारतीत इ 1ली2री चे

एकूण म्हणजे प्रत्येकी २-२ तुकड्या आहेत.आणि 3री,4 थी चे 4 वर्ग गावाबाहेरच्या इमारतीत भरतात.पण कोणतेही कार्यक्रम मुख्य इमारतीतच म्हणजे गावातीलच इमारतीत होतात.

असेच चार साडे चार वाजेची वेळ मुले वर्गात खूप गोंधळ करत होती. मी मोठ्याने ओरडून सांगत होती अरे सर्वांनी शांत बसा,आवाज करू नका पण काहीच फरक पडला नाही ,,त्यांनी उलट गोंधळ वाढवला.

कारण 1ली चीच मुले ती.खूपच घाई होते त्यांना घरी जाण्याची. ३ वाजेपासूनच चालू होते सांगा न मॅडम शाळा केव्हा सुटेल ?आपण सांगावे, अरे बाबांनो सुटेल लगेच. फक्त तुम्ही शांत बसा.दुपारनंतर मुले थोडे मानसिक दृष्टया थकून जातात,मग मनोरंजक पद्धतीने कृती घ्यावी लागते.

मी मुलांना म्हणाले, आता जो कोणी शांत बसेल त्याला मी लगेच आपापल्या घरी जाऊ देईल. मुलांना खूपच आनंद झाला.मग मी चैतालीला डोळे मिटून शांत बसायला सांगितले. आणि म्हणाले जा बरे आता तुझ्या घरी.

मुले गोंधळली. डोळे बंद करून कसे जाता येणार मॅडम आम्हाला घरी. असे म्हणू लागली .

चैतालीला मी याआधीच पूर्वकल्पना दिली होती .वर्गातच डोळे मिटून बसून मनाने आपल्या घरी कसे जायचं ?

चैतालीला म्हटलं आलं का तुझं घर ? हो मॅम आता आलीच घराजवळ ,ओटा आला का तुझ्या घराचा ? नाही मॅडम माझ्या घराला ओटा नाहीये,, बरं मग आली का घरात ??हो हो माझी आईपण आज घरीच होती, शेतात काही गेलती नाही.

बघा मुलांनो चैताली पोहचली कि नाही घरी...

हो, हो म्हणत.सगळी मुले शांतपणे बघत होती.आता मॅडम आम्ही पण, आम्ही पण सर्वांनाच वाटू लागले. किती मजा येतेय या खेळातून. आपण सर्व डोळे मिटून बसू. आता मनाने आपण मामाच्या गावाला जाऊ.बसले का सर्वजण गाडीत आपल्या। मामाच्या गावाला जायला.......🚶‍♀️🚶‍♀️🚌🚌हो ,हो मॅडम तुम्ही पण आहात आमच्यासोबत गावाला येतांना असे वाटतंय आम्हाला.करा मग खूप खूप मजा मामाच्या घरी.बघा मुलांनो आपण स्वप्नातही गावाला जातो,जत्रेत फिरून येतो,यासारखं बरीच स्वप्न आपण पाहतो.या उपक्रमामुळे माझी मुले अतिशय आनंदी झाली.

त्यातूनच मला अकॅडेमीक मेडिटेशनची संकल्पना सुचली.मुलांनी गोंधळ केला की ,सारखं सारखं शांत बसा शांत बसा अस न म्हणता त्या ऐवजी चला आता, आपण अकॅडेमीक मेडिटेशन करूया.

सर्व मुले आश्चर्य चकित होऊन विचारू लागली हे काय असतं मॅडम ?

त्यावर आदित्य राऊत म्हणतो “ अरे आकडे मोड म्हणजे बेरीज करू आपण ”

माझे बाबापण म्हणतात आकडेमोड करता आले की व्यवहार समजतो मला हसू आले त्याच्या निरागस उत्तराचे.

मी म्हणाले, अरे तसं नाही. आपण सर्वांनी डोळे मिटून 15 मिनिटे शांत बसायचे आणि आज सकाळपासून आतापर्यंत काय काय शिकलो ते आठवायचे.

अगदी वर्गात आल्यापासून तर आतापर्यंत आठवा. काही मुले बोलू लागली मॅडम , आज आपण कविता शिकलो,वारांचं गाणं शिकलो.अरे सांगू नका असे, प्रत्येकाला आठवू तर द्या पुढचे

15मिनिटे वर्गात अतिशय शांतता होती.

प्रत्येक जण एकाग्रतेने अभ्यास आठवत होतं . प्रत्येकाचे विचारमग्न चेहरे पाहून मनस्वी खूपच आनंद होत होता.आणि हो जे जे मुलं विचार करून सारं काही बरोबर सांगतील त्यांना छान खाऊ पण मिळणार. हे त्यांना ध्यानात बसण्याआधीच सांगितले होते.

15 मिनिटानंतर हळुवार डोळे उघडून मुले एकमेकांकडे पाहून म्हणू लागली खरंच आपले डोळे बंद होते तरी मॅडमनी जे जे शिकवले ते सर्व आठवत होत.

सगळीच मुले बोटं वर करून मी सांगतो/सांगते आज काय शिकवले ते असे म्हणत होती.

अरे हो हो आपण सर्वांनाच सांगण्याची संधी देणार आहोत.आणि खाऊपण.

हे असे रोजच सुरु झाले.

ती माझ्या मुलांची आता "सवय" बनली आहे.या चांगल्या सवयीमुळे माझ्या

इ.1ली च्या मुलांमध्ये खूपच चांगले बदल झालेले मला  दिसू लागले.

म्हणतात ना आधी विचार-मग कृती, मग सवय आणि सवयींतून चारित्र्य घडत असते.

शेवटी एकच सांगवसे  वाटते .....

माझं मूल, तुमचं मूल

मुलासारखं असतं मुलं

उल्हासाचा जिवंत धागा

नसतो भास नसते हूल


सगळीच मुलं असतात गुणी

प्रत्येकाला घास हवा

आधाराच्या हातामध्ये

आनंदाचा ध्यास हवा, आनंदाचा ध्यास हवा.



## अध्ययन फलनिष्पत्ती ---**

1)मुलं मानसिकदृष्ट्या सुदृढ झाली.

2)वर्गात शांतता राहू लागली.

3)मुलांची एकाग्रता वाढली.

4)लक्षपूर्वक ऐकण्याची सवय लागली.

5)स्मरणशक्ती वाढण्यास मदत झाली.

6)घोकंपट्टी ची सवय कमी झाली.

7)कल्पनाशक्तीस चालना मिळाली.





मनीषा गोकुळ भामेरे.

जि.प.प्रा.शाळा पळासखेडे मिराचे,

केंद्र-नेरी दिगर

ता-जामनेर



## उपक्रमाचे नाव:- आनंदाने वाचू इंग्रजी. . . .

शिकवीत असलेला वर्ग:3री व4थी

विषय: इंग्रजी

**उपक्रमाचा हेतू / अध्ययन निष्पत्ती:**

०४.१७.०२Guesses the meaning of words and sentences from the context

०४.१७.०५ Responds and follows simple instructions/announcements/ Requests in English and acts accordingly

०४.१७.०७ Reads English seen in the surrounding with understanding and at reasonable speed

०४.१७.१९ Reads text written by different people.

**उपक्रमाची कार्यवाही :-**


जामनेर पासून २६कि.मी. अंतरावर कांग नदीच्या किनारी वसलेले सर्व सोयी-सुविधांनी परिपूर्ण असे आमचे फत्तेपूर गाव.गावाच्या अगदी मधोमध आहे आमची जि.प.मराठी केंद्र शाळेची इमारत.या वर्षी माझ्या कडे इ.३ री व ४ थी असे दोन जोड वर्ग आहेत.४- ५ विद्यार्थी सोडले तर बाकी सर्व सर्वसाधारण.

एके दिवशी मधल्या सुट्टीत बाहेर बसलेले असताना एक गाडी आली. भराभर काही पेट्या उतरवून गाडी निघून गेली.सर्व मुले पेटी जवळ येऊन आनंदाने पाहू लागली.कारण त्यांना कळून चुकले की पेटीत नक्कीच छान छान साहित्य असणार.मुलांच्या उत्सुकतेपोटी तात्काळ पेटी उघडली.परंतु आतील साहित्य पाहून मुलांच्या चेहऱ्यावरील भाव झटक्यात बदलले. आनंदी मुलं क्षणात भिती व दडपण आल्यासारखी जाणवली.भाग्यश्री म्हणत होती, "सर्व साहित्य इंग्रजी आहे आपल्याला काय समजणार", तेवढ्यात अमर म्हणाला, "ही पेटी हायस्कूल शाळेला द्यायची असेल", लगेच रिजवान म्हणाला, "मुझे मराठी पढना तो नहीं आता इंग्लिश कब पढू." लाडक्या मुलांची चर्चा ऐकून कळले की त्यांना इंग्रजी भाषेचे टेन्शन आलेय.तेव्हाच मी ठरवले मुलांना इंग्रजी वाचन नक्की शिकवणार तेही दडपण न आणता आनंदाने.

सुरवातीला पेटीतील Instruction set,Action words यांचा सराव घेतला.आठ दिवसातच मुले चित्राशिवाय दिलेला शब्द, सूचना ओळखू लागले.त्यानंतर Rhyming words, classroom words,picture card चा सराव घेतला.महिनाभरातच मुले बरेच

शब्द वाचायला लागले.असाच नेहमी प्रमाणे सराव घेत असताना जास्मिन ने शंका विचारली," मॅडम, तुम्ही आम्हाला शब्दांचे उच्चार सांगितले ते आमच्या



लक्षात राहिले म्हणून आम्हाला वाचता येते. पण कोणताही नविन शब्द कसा वाचायचा". त्यादिवशी मला खूप आनंद झाला.मग मी मुलांना इंग्रजी अक्षरांचे मराठी उच्चार लिहून दिले.दोनच दिवसात मुले p म्हणजे प असे सांगू लागले. त्यानंतर क्रमाक्रमाने a,e,i,o,u या स्वरांचे होणारे उच्चार,त्यावर आधारित शब्दांचा सराव घेतला.जसे,cat,bat,mat ,sat, rat,(या शब्दांचे जवळपास 180 कार्ड इंग्रजी पेटी मध्ये उपलब्ध आहेत.)त्यानंतर लहान सोपे वाक्यवाचन घेतले.एकाच प्रकारची वाक्य सरावासाठी दिली.मुले नविन शब्द वापरुन वाक्य तयार करू लागली.जसे, I like mango,I like apple . थोड्याच दिवसात 4-5 मुले पाठ्यपुस्तकातील घटक स्वत:हून वाचू लागले.8ते 10 विद्यार्थी शब्द,सोपे वाक्य वाचतात.उर्वरीत विद्यार्थी अधिक सराव करून जास्तीत जास्त शब्द वाचनाचा सराव करत आहेत.

हा उपक्रम राबवित असताना मी आवर्जून दोन गोष्टी केल्या. एक म्हणजे मुलांना कधीच रागावले नाही,वाचनाची सक्ती केली नाही.आणि दुसरी गोष्ट म्हणजे उपक्रमातील सातत्य.






## -: उपक्रमाची फलनिष्पत्ती :-

1) मुलांची इंग्रजी विषयाची भिती दूर झाली.

2) मुले आवडीने  वाचन करू लागले .

3) मुले वर्गातील , दुकानावरील पाट्या ,वस्तुंच्या आवरणावरील इंग्रजी शब्द वाचू लागले.

4)3 ते 4 वाक्यात स्वता:विषयी माहिती सांगु लागले .

5) नविन वाक्य तयार करु लागले .




दिपाली जगन्नाथ बुडूखले

जि.प.मराठी केंद्र शाळा फत्तेपूर

ता.जामनेर जि.जळगाव.




## उपक्रमाचे नाव : - बेंच बोलू लागतात. . . . .

विषय:-भाषा , गणित विषयांसाठी उपयुक्त

**उपक्रमाचा हेतू / अध्ययन निष्पती :-**
विद्यार्थी उपस्थिती वाढविणे व शाळेची गोडी निर्माण करणे.

**उपक्रमाची कार्यवाही :--**

लहानपणी खेळलेला "नदी का खडक "हा खेळ मला आजही आठवतो .मला नेहमी नदी आवडायची कारण नदीत कुठेही फिरता येते ,खडकावर मात्र एकाच जागी थांबावे लागते.आतापर्यंत माझ्या दोन शाळा झाल्या त्याही मोठ्या आणि चांगल्या आता मात्र माझी बदली झाली ते ही द्विशिक्षकी शाळेवर.शहापूरकडे जाताना पहिलचं गाव म्हणजे माझी शाळा रस्त्याच्या उजव्या बाजूने सर्वप्रथम भगवान श्रीकृष्णाचे नयनरम्य मंदिर लागते ,नंतर दिसतात टुमदार झोपड्या. त्या झोपड्यातून डोकावून पाहणारे हिरवेगार झाडे जी मनाला मोहून टाकतात. मंद आवाजात बैलांच्या घंटांचा नाद ऐकू येतो.आणि गावाच्या शेवटी गाव कसलं वस्तीत आमची ती शेवटी दिसते ती खडकावर वसलेली माझी दत्तनगरची टुमदार शाळा. हजर झाल्यावर शाळेचे बाह्यरंग जेमतेम होत.अंतरंग (भिंती) फारसे बोलके नसले तरी त्यातील किलबिल करणारे माझे मुले मात्र फार बोलकी होती. त्यांच्या डोळ्यात भविष्याची स्वप्न होती, चिकाटी होती, जिद्द होती ,आणि तेच मी हेरले.सहकारी चांगले होते.त्यांच्या मदतीने बाह्यरंग बोलका केला. आता वेळ होती अंतरंग अधिक बोलका करण्याची. मुले बोलकी होती त्यामुळे फारसा वेळ लागला नाही. हसत खेळत ज्ञानदानाचे काम चालू होते .शैक्षणिक साहित्याचा वापर करून मुले शिकत होती .पण मला एक गोष्ट खटकत होती, ती म्हणजे वर्गातील खराब झालेले बेंच त्यांच्यावर काही खोडकर मुले पेनाने पटेल ते लिहायची, खराब करायची, शाई टाकायची आणि तेच मी हेरलं. त्या मुलांना जवळ बोलावले समजून सांगितले बेंच खराब करू नका.पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही .मग त्यांना काही वस्तू दिल्या व त्याच वस्तू चार-पाच दिवसांनी त्यांच्याकडून मागून घेतल्या तर वस्तू चांगल्या स्थितीत दिसल्या मग मुलांना पटवून दिले स्वत:ची वस्तू तुम्ही कशी जपता मग शाळा आपली, वर्ग आपला मग ज्या बेंचवर तुम्ही बसता तो बेंच का खराब करता .त्यांना पटले मग एक कार्यक्रम हाती घेतला .स्वत:चा बेंच स्वत: स्वच्छ करायचा ,झाली सफाई सुरू

क्रीडांगणावर सर्व बेंच नेले. पाण्याचा प्रश्न होता पण म्हणतात ना "कोशिश करणे वालो की कभी हार नही होती" पावसाळ्याचे दिवस होते धो धो धो धो

पाऊस सुरू झाला साबणाचा फेस व हाताची कमाल झाली.



बेंचला कसे नवीन रूपच आले होते. मग मी प्रत्येक मुलांना सांगितले तुम्हाला आवडेल तो घटक सांगा .प्रत्येकाच्या बेंचवर त्यांच्या आवडीचे घटक विषयानुसार लिहिले गेले .मुलांना फार आनंद वाटला.

प्रत्येकाला वाटायचे माझ्या बेंचचा नंबर कधी येईल उत्सुकता वाढली ‘स्वत:च्या बेंचवर लिहिलेले वाचून दाखवताना त्यांच्या चेहऱ्यावरील Confidence पाहण्यासारखा होता’ तसा माझ्याकडे इयत्ता पहिली व दुसरीचा जोड वर्ग आहे पण द्विशिक्षकी शाळेत तसे काही नसते. सर्व शाळाच आपली असते.या उपक्रमामुळे असा फायदा झाला की, एक मुलगा एक मुलगी बेंचवर बसवल्यामुळे स्त्री-पुरुष समानता हे मूल्य रुजवल्या गेले त्यानंतर त्यांच्यात स्पर्धा निर्माण झाली, चढाओढ निर्माण झाली, एकमेकांचा मुले आदर करू लागली ,त्यांच्यातील अडचणी एकमेकांमध्ये सोडवू लागली, नंतर मी पहिलीची व दुसरीची अशी जोडी केली त्यामुळे ते एकमेकांना वाचनात ,लेखनात मदत करू लागले .पाढे, इंग्रजी शब्द ,जोडाक्षरे,छोटे उतारे, आकृत्या,रंगांची नाव,सामान्य ज्ञान, अशा अनेक विषयात मुले तरबेज झाली. स्वत:च्या बेंच वरचे वाचून दाखवण्यात त्यांना आनंद वाटू लागला .मग मात्र पंधरा दिवसांनी बेंचवरच्या जोडीची आदलाबदल केली, रोटेशन पद्धती अवलंबली त्यामुळे प्रत्येक बेंच वरचं लिहिलेलं मुले समजून घेऊ लागली प्रतिसाद चांगला मिळू लागला.



मुले त्यांच्या कामात मग्न राहू लागली . बुद्धीला चालना मिळाली. वारंवार गैरहजर राहणारी मुले शाळेत काहीतरी नवीन होत आहे त्यामुळे उपस्थित राहू लागली. शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील नाते दृढ झाले. कठीण विषय सोपे झाले.व समजलेले विषय स्मरणात राहू लागले .हे सर्व कशामुळे शक्य झालं तर ते आमचे काळेकुट्ट झालेले बेंच आता अक्षरांनी नटले व शब्दांचे रूप घेऊन बेंच आता मुलांसोबत बोलू लागले .......

"शाळाही शाळा असावी।

## ---:अध्ययन निष्पत्ती :---

१) स्त्री-पुरुष समानता मूल्य रूजले.

२)मुलांचा आत्मविश्वास वाढला.

३)विद्यार्थी उपस्थिती वाढली व शाळेची गोडी वाटू लागली .

४)परस्पर सहकार्य वृत्ती वाढीस लागली.

५)प्रत्येक मुल बोलके झाले.

६)विद्यार्थी व शिक्षकाचे नाते अधिक दृढ झाले.

७)बेंच स्वच्छ राहावा म्हणून मुले नियमित हात धुवू लागली व आपोआपच स्वच्छतेच्या सवयी रुजू लागल्या .

नकोत नुसत्या भिंती।

त्या भिंतींना अर्थ असावा।

नकोत नुसती माती।

मातीला शब्दरूप द्यावे

शब्दांना मग गती ।

गतीला मग पंख द्यावे।

उडण्यास मुक्त नभी



दिपाली देविदास पंडित

जि.प.शाळा दत्तनगर

ता. जामनेर



## उपक्रमाचे नाव : – अंकातून चित्रनिर्मिती

वर्ग- इयत्ता पहिली

विषय- गणित व चित्रकला

### उपक्रमाची कार्यवाही :-

'शाळा नसते केवळ खडू आणि फळा, शाळा म्हणजे विद्यार्थ्यांशी लळा' चिमुकल्यांच्या स्वप्नांना आकार आणि कलागुणांचा आविष्कार करत विद्यार्थिनींना गगन भरारीचं वेड लावणारी माझी जि प मराठी प्राथमिक शाळा पाळधी ( कन्या ) एम्पथी फाऊंडेशनच्या सीएसआर फंडातून उभी राहिलेली प्रशस्त सुसज्ज अशी सुंदर इमारत. बाह्यांग जेवढे छान त्याहीपेक्षा अधिक सुंदर असे शाळेचे अंतरंग म्हणजेच आमच्या विद्यार्थिनी. शाळेत वावरतांना आपल्या आजूबाजूला कल्पना चावला, इंदिरा गांधी ,झाशीची राणी, सावित्रीबाई फुले, पी.टी. उषा इत्यादी असल्याचा भास होतो. यावर्षी माझ्याकडे पहिलीचा वर्ग आला. आतापर्यंत मोठे वर्ग घेतल्यामुळे मला पहिलीच्या वर्गाचे टेन्शन आले होते. परंतु पहिलीचा वर्ग म्हणजे एक सुवर्णसंधी असते आपल्या परीने कल्पकतेने विद्यार्थ्यांना तयार करण्याची. माझ्या पहिलीच्या वर्गाचा पट ४० आहे.

गणित हा विषय अमूर्त आहे म्हणूनच विद्यार्थ्यांना काहीसा कठीण वाटणारा. चष्मा ,सायकल असे म्हटल्यावर वस्तू डोळ्यासमोर उभ्या राहतात परंतु आठ म्हटले तर अमूर्त. असे असले तरीही गणित हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. अगदी जन्माची चाहूल लागल्यापासून मरणोत्तर दहावे तेरावे होईपर्यंत गणित आपल्या सोबत असतो. म्हणूनच गणितात होणाऱ्या छोट्या  चुका वेळवर दुरुस्त केल्या नाही तर पुढे विद्यार्थ्यांमध्ये न्यूनगंड ,भीती निर्माण होते.



१ ते १० अंक शिकवल्यानंतर विद्यार्थीनी अंकाचे क्रमवार  वाचन लेखन व गणन करू लागल्या. परंतु जेव्हा -चित्र मोजून चौकटीत उत्तर लिही ,सांगितलेला अंक फळ्यावर काढ, दोन ला गोल कर ,तीन ला चौकट कर  असे प्रश्न यायचे तेव्हा गोंधळायच्या. बोटांची, कृतीची, वस्तूची, चित्रांची, ध्वनीची ,स्पर्शाची भाषा शिकवूनही अंक व त्यांचे चिन्ह यात

विद्यार्थिनी चुका करायच्या. तेव्हा अंकातून चित्र निर्मिती हा उपक्रम मी वर्गात राबविला. त्यामध्ये १ ते १० अंकांचा संबंध आम्ही चित्राशी जोडला तो फोटोमध्ये दाखवल्याप्रमाणे _

याप्रमाणे एक वांग्याचा, दोन बदकाचे, तीन वाटीला वाटी अशी सांगड घातली. चित्रात दडलेला अंक शोधण्यास सांगितले. त्याला गिरवण्यास सांगितले.विद्यार्थ्यांनी स्वत: चित्रे काढली एवढेच नव्हे तर स्वत:ही नाविन्यपूर्ण चित्राचा शोध लावला जसे दोन पासून साप, पाच पासून कमळ, चार पासून बैल, शून्यातून मासा इत्यादी. मुलींना अंकांमध्ये चित्रे आणि चित्रामध्ये अंक दिसू लागले. अगदी आठच दिवसात वर्गातील सर्व मुली अचूक अंक लेखन-वाचन करू लागल्या व पुढील संख्याज्ञान घेण्यासाठी तयार झाल्या.




**उपक्रमाची फलनिष्पत्ती:**

१) अंक व त्यांची चिन्हे यातील गोंधळ दूर झाला.

२) १ ते १० अंकाचे दृढीकरण व सराव झाला.

३) अमूर्त अंकाना मूर्त स्वरूप आले.

४) गणिताविषयी आवड निर्माण झाली. भीती दूर झाली.

५) कल्पकतेला व सृजन शक्तीला वाव मिळाला.

६) चित्रकलेविषयी आवड निर्माण झाली.

७) चित्रकला सोपी वाटू लागली.

याच प्रमाणे इंग्रजी मुळाक्षरे, मराठी मुळाक्षरे ,इंग्रजी अंक शिकवण्यासाठी देखील भरपूर चित्रांचा वापर आम्ही करत आहोत . धन्यवाद !



**श्रीमती सविता गणपतराव धुरडे**

**जि प मराठी प्राथमिक शाळा पाळधी कन्या**

**तालुका जामनेर**

# उपक्रमाचे नाव : -मानवी तसेच विविध वस्तुंच्या मदतीने मनोरे तयार करणे

शिकवित असलेला वर्ग — 2 री उपक्रमासाठी विषय—शारिरीक शिक्षण

घटक— 1)विविध हालचाली व योग्य शारिरीक स्थिती

उपक्रमाची कार्यवाही —

माझी शाळा जि.प.प्रा.वि. मं. खादगाव ता.जामनेर जि.जळगाव,जामनेर पासून जवळ असलेली व कांग नदीच्या काठावरील,वाघूर धरणाच्या जवळची शाळा.वाघूर धरण झाले म्हणून नवीन वसाहत असलेले गाव म्हणजे खादगाव. माझी शाळा फक्त शाळा नाही तर विविध उपक्रमांचे भांडार असलेले सुंदर असे जग आहे. त्यात नाविण्याची ओढ असलेल्या माझ्या विद्यार्थ्यांबद्दल काय सांगावं आणि किती सांगावं?

मधली सुटी झालेली होती सगळी माझी पाखरे जेवण करुन कोणी खेळत होती,तर कोणी वर्गात माझ्याभोवती घिरट्या घालत होती.मी सुद्धा निवांत वेळ असल्यामुळे जमिनीवर खाली बसून होते. आणि आज ठरवले की,विद्यार्थ्यांना उपक्रमाच्या माध्यमातून एका खेळाकडे घेऊन जायचे ,ज्या उपक्रमातून मला अपेक्षीत कृती करुन घेता येईल.

मुलांना खेळ खेळायला खूप आवडतात,मात्र लहान वयोगटातील मुले शिस्तीत,नियमांना धरुन खेळ खेळतीलच असे नाही,म्हणून मी आज एकाच उपक्रमातून विविध घटकांना एकत्र बांधण्याचा जाणीवपुर्वक प्रयत्न केला ते घटक म्हणजे,

1) विविध हालचाली व योग्य शारिरीक स्थिती.

2) कौशल्यात्मक उपक्रम

3) अभिरुचीपुरक उपक्रम

या घटकांच्या माध्यमातून मला अपेक्षीत अशा अध्ययन निष्पत्ती साध्य करुन घ्यायच्या होत्या. मी खाली बसून शेजारीच असलेल्या ग्लाससोबत खेळण्याची मुदामच कृती करत होती. काही क्षणात मुले माझ्याभोवती जमा होऊन आश्चर्याने पाहु लागली ,मी ग्लास सरळ रांगेत,विशिष्ट अंतरावर एकमेकांवर ठेवत होती. जयश्रीने विचारलेच ,मॅम या खेळाचे नाव काय? मी म्हणाले मनोरे.

काही सांगायाच्या आत सर्व मुले गटागटाने विविध वस्तुंच्या मदतीने तीच कृती करु लागले. वस्तू ठेवत असतांना विशिष्ट अंतर ठेवणे, मोठी वस्तु खाली व लहान वस्तु वर.या सर्व प्रकारात काही मुले वस्तु ठेवत असतांना त्या वस्तु एकमेकांवर ठेऊ शकत नव्हते.मग ज्यांना वस्तू ठेवता आल्या ती मुले मार्गदर्शन करायची. अशा पद्धतीने सर्व मुलांना विविध वस्तूंच्या मदतीने छान मनोरे तयार करता आले, काहींना थोडा वेळ लागला खरा मात्र मनोरे सर्वांनी केले.

वर्गातील चौकस विद्यार्थीनी पुनम हिची घालमेल चालली होती.तिला विचारले , काय अडचण आहे? ती



म्हणाली जर वस्तूंच्या मदतीने आम्ही मनोरे तयार करु शकतो तर आम्ही स्वत: उभे राहून ,बसून मनोरे का तयार करु नये? मी थोडा वेळ विचार केला,ही मुले लहान आहेत यांना करता येईल का?एखादा पडला,लागलं तर!

मात्र पुनम सोबत सगळेच आता हट्ट करु लागले , आम्हाला मनोरे करायचे,ज्या पद्धतीने वस्तुंचा उपयोग करुन मनोरे तयार केले होते त्याच पद्धतीने त्यांनी मानवी मनोरे तयार करायला सुरुवात केली.प्रथम त्यांचा तोल जायचा, एकमेकांमधील अंतर कमी जास्त व्हायचे, त्यामुळे पडायचे, जास्त वजनाची मुले खांद्यावर पाठीवर उभी राहिल्यामूळे त्यांना त्रास व्हायचा यातून त्यांनीच मार्ग शोधला. कमी वजनाच्या मुलांना खांद्यावर पाठीवर उभे केले.कधी एकमेकांचे हात धरुन कधी पाठीवर पाय देऊन मनोरे तयार करु लागली आणि त्यांनी बघता बघता मानवी मनो-याचे पाच प्रकार विध्यार्थ्यांनीच सादर केले याचा मला आनंद झाला.



## उपक्रमाची फलनिष्पत्ती :-

1) सहकार्याची भावना वाढीस लागली .

2) शरीराचा समतोल साधता आला .

3) सहसंबध जोडता आला .

4) शारिरीक क्षमतांचा विकास करता आला .

5) खेळातून आनंद निर्माण झाला .

6) व्यायामाची सवय लागली .

7) विचार करायला प्रेरणा मिळाली .

8) विविध क्षमतांचा विकास होण्यास मदत झाली .

9 ) संघटित वृत्ती वाढीस लागली .

10 ) परिसरातील उपलब्ध साहित्यापासून आधुनिकतेशी सांगड घालून अभिरुचीनुसार खेळ खेळता येऊ लागले .







माया प्रकाशराव शेळके

जि.प.प्रा.वि.मं.खादगाव

ता.जामनेर जि.जळगाव



# उपक्रमाचे नाव : - विज्ञानाची परसबाग

विषय :- सामान्य विज्ञान इयत्ता - 6 वी व 7 वी

घटक - वनस्पती संबंधित घटक व प्रयोग

## उपक्रमाचा हेतू / अध्ययन निष्पत्ती :

(उपक्रमाशी संबंधित)

1.मुळांचे प्रकार :सोडमुळे, तंतुमय मुळे

2.वनस्पतीचे रोपटी, झुडुप, वृक्ष, वेली असे वर्गीकरण करतात.

3.वनस्पतींचा अनुकूलनांचा अधिवासाशी संबंध अभ्यासतात.

4.वनस्पती वाढीसाठी सुर्यप्रकाशाची गरज व प्रकाशसंश्लेषण प्रक्रिया अभ्यासतात.

5.वनस्पतीची काळजी घेतात.

6.वनस्पतींचा पर्यावरण संरक्षणात सहभाग अभ्यासतात.

7.वनस्पतीची अन्नप्रक्रिया जाणून घेतात.

8.वनस्पती मधील भौतिक व रासायनिक बदल सांगतात.

9.वनस्पती मधील इंद्रिय संस्था अभ्यासतात.

10.वृक्षरोपण करतात

11.जमिनीची धूप रोखण्यासाठी वनस्पतीचा सुयोग्य वापर करतात.

12.वनस्पतीच्या खोडांचे प्रकार अभ्यासतात.

## उपक्रमाची कार्यवाही :-

आमची जि. प. मराठी केंद्र शाळा, जामनेर ही गजबजलेल्या व बोलक्या वातावरणात वसलेली. तशीच आमची 6 वी ची मुले ही बोलकीच व हजरजवाबी. त्यांना विज्ञानातही नाविन्यता आणून बोलके करण्याचा विचार सकाळ पासून चालू असताना काही मुले-मुली माझ्या जवळ आली. माझा हात धरून शाळेच्या आवारात कोपरा आहे तेथे घेऊन गेली. तेथे टोमॅटोची रोपे उगवली होती.

“आम्ही काही दिवसांपूर्वी भेळ केली होती व खराब झालेला टोमॅटो फेकला होता. त्यातून रोप उगवले” नळाचे पाणी तेथील जागा ओली ठेवते. त्यामुळे उगवले." मुले हे सांगत असताना मला त्यांच्या डोळयांत आनंद, उत्साह व वेगळी चमक जाणवली. बस मग. टोमॅटोच्या रुजलेल्या बिया माझ्या डोक्यात नावीन्यतेचा उपक्रम रुजवून गेला.

त्यांना मी शिकविण्यापेक्षा स्वत: शिकावे व बोलते व्हावे यासाठी स्वयंपाक घरातील धने, कोरड्या मिरच्या, टोमॅटो, कारल्याच्या बिया, चवळी,तुर दाणे घेऊन शाळेत गेली. मुलांच्या मदतीने कुड्यांमध्ये माती भरली व बिया टाकल्या. मी रोज

त्यांना पाणी देत होती. मुले बघत होती. काही दिवसांनी अंकुर वर आले व मुलांना खूप आनंद झाला. आता मुले रोज पाणी देवु लागली. मी त्यांना विचारले यातुन तुम्ही काय शिकले ? मुलांची उत्तरे येवू लागली. "मॅडम प्रत्येक बिया रुजण्याचा कालावधी वेगवेगळा होता" ,"मॅडम जास्त पाणी, जास्त ऊन यामुळे पिके खराब होतात "अशा विविध उत्तरांनी मुले बोलकी झाली. वर्गातील अबोली ची फुले आता बोलू लागली होती. मग जशी रोपे वाढत गेली तशीच विज्ञानाची रंजकता ही वाढत गेली. विविध प्रयोग व मुद्दे यांच्या साहाय्याने मी शिकविले.




आता झाडावर चढणारी, फांद्या तोडणारी मुले आवारातील झाडांना पाणी देतात.त्यांची काळजी घेतात.इतर मुलांना महत्त्व सांगतात. त्यांना बघून मला त्यांचा अभिमान वाटतो. माझी "विज्ञानाची परसबाग" सार्थक झाली असे वाटते.

## उपक्रमाची वैशिष्ट्ये:

1.या उपक्रमासाठी खर्च लागत नाही.

2.सर्व साहित्य सहजपणे उपलब्ध होते.

3.वेळ कमी लागतो.

4.विविध संकल्पना स्वत: निरिक्षणाने व प्रयोगाने दृढ होतात.

5.विषय रंजक होतो व विद्यार्थ्यांना आवड निर्माण होते.

## @उपक्रमाची फलनिष्पत्ती:

1.वनस्पती वाढीसाठी सुर्यप्रकाशाची गरज असते हे जाणतात.

2.वृक्षरोपण करतात.

3.वनस्पतीची काळजी घेतात.

4.वनस्पतीचे रोपटी, झुडुप, वृक्ष, वेली असे वर्गीकरण करतात.

5.वनस्पतींच्या हालचाली ओळखतात.

6.वनस्पतीची अवयव रचना व कार्य सांगतात.

7.हरितलवकाचे महत्त्व सांगतात.

8.झाडांचे महत्त्व सांगतात.

9.विद्यार्थी वनस्पतींच्या पानावरून रोपे ओळखतात.

10.मुळांचे प्रकार ओळखतात.

11.खोडाचे प्रकार ओळखतात.

12.जमिनीची धूप रोखण्यासाठी झाडांचे महत्त्व आहे हे जाणतात.

13.विद्यार्थी बिया ओळखतात.

14.वनस्पतीची अन्नप्रक्रिया सांगतात



वर्षा मुकुंदा सुरवाडे

जि.प.मराठी केंद्र शाळा ,जामनेर

ता. जामनेर



# उपक्रमाचे नाव:-संगणकाची दुनियादारी

💥 विषय=तंत्रज्ञान💥 घटक=संगणक भागांची ओळख

उपक्रमाची कार्यवाही :-

जामनेर तालुक्यातील ग्रामीण भागातील आमची गारखेड्याची उपक्रमशील शाळा.रस्त्याला लागुनच असणारी आमची ही शाळा. शाळेजवळ आपल्या खान्देशातील एक महत्त्वाचे आणि ऐतिहासिक वारसा लाभलेले तसेच पुरातन दगडी काम असलेले प्राचीन हेमाडपंथी शैलीचे शिवमंदिर आहे.आमच्या शाळेत या ज्ञानाच्या मंदिरात मुले व मुली स्वच्छंदपणे पुस्तकाच्या विश्वात जाऊन ज्ञानाचे धडे शिकतात.पण पुस्तकी ज्ञाना सोबत त्याला तंत्रज्ञानाची पण आपण जोड दिली पाहिजे,कारण सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे असे मला वाटते.माझ्या वर्गात कॉम्प्युटर असल्याकारणाने माझ्या वर्गातील मुलांना कॉम्प्युटरची सर्व माहिती असणे अपेक्षित होतेच.वारंवार सांगुनही कॉम्प्युटरचे भाग व त्यांचे उपयोग लक्षात राहत नव्हते.विद्यार्थी हा शिक्षणाचा केंद्र बिंदू आहे.जर या केंद्र बिंदूचा समतोल राखला जाईल तर भारत देश शिक्षण क्षेत्रात महासत्ता नक्कीच बनेल.

संगणक हा ग्रामीण भागातील मुलांसाठी अतिशय वेगळा व त्यांच्या बुद्धी पटलाच्या बाहेरील भाग आहे. कारण ही वस्तू सर्व साधारण विद्यार्थ्यांच्या घरी नसते.त्यामुळे संगणकाबद्दल त्यांच्या मनात अधिक कुतूहल व जाणून घेण्याची जिज्ञासा सहज तयार होते. संगणक म्हणजे काय?संगणकाची दुनिया काय?त्याची व्यापकता काय?यासाठी नुसते रटाळ पद्धतीने अध्यापन करणे हे मुलांना कंटाळवाणे वाटते.म्हणून मी मुलांना संगणकाच्या दुसऱ्या दुनियेत घेऊन गेली.




संगणकाची प्रभावीपणे ओळख होण्यासाठी मी माझ्या वर्गातील मुलांनाच संगणकाचे भाग म्हणून आत्मकथा स्वरूपात मांडण्यास सांगितले.संगणकाच्या भागांची माहिती देऊन त्या भागांचे चित्रकार्ड मुलांना विभागून दिले. व मी मॉनीटर बोलतो,मी माऊस बोलतो याप्रमाणे प्रत्येक भाग आत्मकथा म्हणून सादरीकरण करण्यास सांगितले. जसे::---

1)**माँनीटर**=मला संगणकाचा पडदा म्हणतात. माझ्या पडद्यावर तुम्ही फोटो, व्हिडिओ पाहू शकतात.खेळसुद्धा खेळू शकतात.



2)**C.P.U**= नमस्कार, मला मराठीत मध्यवर्ती प्रक्रिया केंद्र म्हणतात. तसेच संगणकाचा मेंदू देखील म्हणतात हं..माझ्या मेंदूत गणितीय क्रिया व माहिती साठवून ठेवली जाते.



3)**माऊस**=कसे आहात तुम्ही?मला माऊस म्हणतात, आणि तुमच्या भाषेत उंदीर......मला संगणकाचा मुकुट म्हणतात. मला तीन बटणे असतात. तुम्ही माझ्या साहाय्याने माँनीटर वर बाण फिरवू शकतात.



4)**किबोर्ड**=मी तुम्हाला टाईप करण्यास मदत करतो,मजा येते ना तुम्हाला टाईप करायला.




अश्याप्रकारे जर प्रत्येक भागांची कृतीद्वारे माहिती करून दिली तर मुलांच्या बुद्धीपटलावर कायम स्वरुपी ही माहिती बिंबते.

हा उपक्रम राबवल्याने माझ्या वर्गातील जवळजवळ 99% मुलांना संगणकाची माहिती सांगता आली.ती पण अगदी हसत खेळत.

✨**उपक्रमाची फलनिष्पत्ती=**

1)संगणकाबद्दल अधिकाधिक माहिती होते.

2) भागांची नावे व उपयोग सांगतात.

3)लक्ष केंद्रित होते.

4)डिजिटल अभ्यास क्रमात रस घेतात.

5)कठीण विषय सोपा करून सांगण्यास मदत होते.

6)तंत्रज्ञानाशी संबंधित इतर साधनांची माहिती करून घेण्यास उत्कंठा निर्माण होते.

7)संगणकाच्या साहाय्याने स्वयंअध्ययन प्रक्रिया प्रभावी होते.

8)विज्ञानाची ओळख होण्यास मदत होते.

9)शालेय वयातच आधुनिकतेची बीजे पेरली जातात.

10)आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख होण्यास मदत होते.




सौ.कविता ज्ञानेश्वर चौधरी.

जि.प.प्राथमिक विद्यामंदिर गारखेडा.

ता.जामनेर. जि.जळगाव




# उपक्रमाचे नाव:-हसत खेळत इंग्रजी वाचन करूया

मी ....

सौ भारती किरण पाटील......

जि प शाळा शेळगाव............

🌹विषय: English 🌹

🌹इयत्ता : तिसरी🌹

🌷🌷अध्ययन निष्पत्ती:🌷🌷

०३.१७.०६: Reads aloud groups of words ,short sentence with proper pauses , stress intonation, pace and expression. ........

## उपक्रमाची कार्यवाही :-

शेळगाव शाळेत मी रुजू झाले तेव्हा मला ही शाळा का मिळाली ? अशी माझी स्थिती होती .... पण आमच्या पाच जणांच्या नवीन टीमने शाळा आता इतकी छान केली की या शाळेतून बदली होऊ नये असे वाटते.

माझ्याकडे दुसरी आणि तिसरी असे दोन वर्ग आहेत. एका वर्गाला शिकवताना दुसऱ्या वर्गाला त्यांच्या कामात अडकवून कसं ठेवायचं ? यासाठी बरेच काही प्रयत्न करून पहावे लागले त्यातूनच छान सिद्ध झालेला माझा हा उपक्रम त्यालाच आपण स्वयंअध्ययन असेही म्हणू शकतो , ज्यामुळे शिक्षणही होतं आणि मुलांना मी हे स्वत: केलं याचा अभिमान वाटतो त्याचा आत्मविश्वास वाढतो.

दुसरीच्या वर्गाला शिकवताना तिसरीच्या मुलांना जर इंग्रजीचं वाचन करा, दिलेला lesson read करा असे सांगितलं तर ते जो शब्द त्यांना वाचता येत नाही तो शब्द "मॅडम याचा उच्चार काय आहे?" हे प्रत्येक वेळेला विचारायला यायचे ज्यामुळे शिकवण्यात खंड पडायचा आणि दुसरीच्या मुलांचे त्या विचारणाऱ्या मुलाकडे लक्ष जायचे मग मी तिसरीच्या मुलांना मोबाईल वरील" गूगल ट्रांसलेट" या ॲपची ओळख आणि वापर समजावून सांगितला आता मुलं लेसन रीड करताना नोटबुक मध्ये त्यांना ज्या शब्दांचा उच्चार करता येत नाही. ते शब्द अगोदर वहीत लिहून घेतात. असे सगळ्यांचे लिहून झाल्यावर एकेकाने आपल्या वहीतील शब्द फळ्यावर लिहून ते शब्द गुगल ट्रान्सलेटर शोधून त्याचा उच्चार



आणि अर्थ फळयावर लिहिता. एकाचे लिहून झाल्यानंतर लिहिलेल्या शब्दांपैकी जे शब्द त्याला आले नाहीत. तेच शब्द तो फळयावर लिहित होता. आणि गुगल ट्रान्सलेटर शोधून त्याचा उच्चार आणि अर्थ ही लिहिला. असे करत सर्वांनी आपापले शब्द कोणताही शब्द परत होणार नाही, याची काळजी घेऊन फळयावर लिहिल्यान वर्गातील प्रत्येक जण आपली वही आणि पुस्तक समोर ठेवून लेसन वाचतात .जेव्हा दुसरीला माझे शिकवून तिसरीच्या मुलांकडे आल्यावर मुले वाचन करून दाखवतात. त्यावेळी वही समोर ठेवून वाचन घेतले जाते . असेच घरून आणि आणि वर्गात तीन-चार वेळेस वाचन घेतल्यावर मुले वही पुढे न ठेवता छान वाचतात.




अध्ययन निष्पत्ती

१.इंग्रजीविषयी गोडी निर्माण झाली.

२.जे आपण वाचतोय त्याचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न करू लागले

३.स्वतः शब्द शोधल्या मुळे तो शब्द लक्षात राहतो .

४.त्या शब्दांचा वापर ती करू लागली .

५.शब्द संग्रह वाढला .

६.मला इंग्रजी वाचता येते , मी हुशार आहे असा आत्मविश्वास निर्माण झाला

७. लेसन किंवा स्टोरी किंवा एखादी पोएम परिपाठाच्या वेळेस सर्व शाळेसमोर वाचन करायला लागले तर खरोखर त्या मुलांमध्ये इंग्रजीची भीती राहिलीच नाही

८ याचा फायदा असा ही झाला की समोरचे ऐकणारे प्रेक्षक .(विद्यार्थी )यांनाही वाटले जर तिसरी सारख्या वर्गातील मुले एवढे छान वाचू शकतात तर आपण का नाही ? ही जाणीव त्यांच्यात निर्माण झाली. पुढे हा उपक्रम मी शाळेत राबवला. प्रत्येक वर्गातील मुलांना वार वाटून परिपाठात आपापल्या पुस्तकातील वाचता येणारे पेज वाचायला सांगितले , त्यांचा ही छान प्रतिसाद

मिळाला , समाधान मिळालं
धन्यवाद......!!!






भारती किरण पाटील..
जि प शाळा शेळगाव..
ता. जामनेर






# जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जळगाव

गट नं.१८३-२/१८४,अजिंठा मार्ग चिंचोली शिवार,चिंचोली ता.जि.जळगाव राज्य. महाराष्ट्र